ललिता गंडभीर
Lalita Gandbhir.
4200 North Ocean Drive.
1501-2
Riviera Beach, FL. 33504.
U. S. A.

# सुवर्णमध्य - भाग ३

संध्याकाळी आमच्यासाठी मॉनिकाच्या आईच्या स्वैपाकीणीने खास जेवण केले होते. टेड व संजय मुलांची व्यवस्था करून आले होते. त्यामुळे त्यांची काळजी नव्हती.

आम्ही झोपल्यावर बाहेरून साधारण बारा वाजता मोठ्या आवाजात गाणे ऐकू येऊ लागले. मग कुणी तरी दारू पिऊन बरळतो आहे असा भास झाला. संजय व मी उठून खाली लिव्हिंगरुममध्ये आलो. टेड व मॉनिकाही नाईट गाऊन मध्येच उभे होते. मॉनिकाने दरवाजा उघडून गाणाऱ्या माणसाला आत घेतले. एक अव्यवस्थित कपडे घातलेला, पिंजारलेल्या केसांचा, तांबड्या डोळ्यांचा, पन्नाशीच्या आसपासचा पुरुष झिंगत आत आला. 'मॉनिका' तिच्या गळ्याभोवती हात टाकत तो म्हणाला, “आज तू अजून जागी कशी? झोपली नाहीस ?”

“शश रॉन (Ron)” मॉनिका म्हणाली. मग टेडकडे वळून तिने ओळख करून दिली. 'हा माझा सर्वात मोठा भाऊ रॉन. आणि रॉन हा माझा नवरा टेड, हे आमचे शेजारी संजय व आणि त्याची पत्नी रीना.”

“वा ! तुझं लग्न कधी झालं. ?” रॉनने विचारलं.

“रॉन, माझं लग्न केव्हाच झालंय. मला चार मुलंही आहेत. तुला हे मी कितीदा सांगितलं आहे.” मॉनिका शांत झाली.

“छान! म्हणजे आजोबांच्या आत्म्याला शांती लाभेल,” त्याने छातीला हात लावून छताकडे पाहत क्रॉस केला.

“हॅलो टेड !” म्हणत तो टेडकडे वळला .

टेड आणि संजय त्याच्या अवताराकडे कपाळाला आठ्या घालून पाहत होते. मॉनिका शांत होती. तरी मलाच मनातून तिच्यासाठी मेल्याहून मेल्यासारखे होत होते.

“रॉन, तू आता जाऊन झोप जा.” मॉनिकाने हुकुम सोडला. दारवान ताबडतोब पुढे झाला. त्याने रॉनला धरून वरती नेले. आम्ही दोघेही मुकाट्याने वर गेलो.

दुसऱ्या दिवशी नर्सला लवकरच परत यायचे कबूल करून मॉनिकाने शोफरला कार केपकॉडकडे घ्यायला सांगितली. शोफरला कुठे जायचे ते ठाऊक होते. प्रॉव्हिन्सटाऊनला पोचल्यावर ती आम्हाला एका छोट्या दुकानात घेऊन गेली. दुकान बंद होते. तिने दुकानाचा दरवाजा ठोठवला. मी आसपास बघतच होते. त्या चिंचोळ्या रस्त्यावरती हिप्पीसारख्या राहणाऱ्या, कपडे घालणाऱ्या लोकांची रहदारी होती. दुतर्फा हाताने बनवलेल्या वस्तूंची दुकाने होती. दुकानाचा

दरवाजा थोडासा उघडला गेला. आतून भगवी कफनी, गळ्यात रुद्राक्षाची माळ, लांब दाढी व पोनीटेलमध्ये बांधलेले लांब केस या अवतारातला एक पंचेचाळीसच्या आसपासचा पुरुष बाहेर डोकावला.

“मॉनिका” असे उद्‌गारात त्याने दार उघडले. आम्ही आत गेल्यावर बंद केले. खोलीत खाली बसायला गादी होती. खुंट्याला चांदीचे बनवलेले दागिने लावले होते. एका लहान खिडकीतून थोडा उजेड येत होता. कोपऱ्यात एक नुसता बल्ब लावलेली वायर होती.

“मॉनिका” आज इकडं कुठं?” त्याने आमच्याकडे पाहत म्हटले. “आणि बरोबर ही कोण फौज आणलीयंस ?”

“हा माझा नवरा टेड.” मॉनिकाने ओळख करून दिली. “आणि हे आमचे शेजारी संजय व रीना.” मग ती आमच्याकडे वळली आणि म्हणाली, “हा माझा दुसरा भाऊ रिक (Rick).”

“बसा बसा.” म्हणत रिकने आम्हाला बसायला जागा करून दिली.

“केव्हापासून तुला भेटायचं होत टेड. पण ही मॉनिका तुझ्या वाऱ्याला येऊ देईल तर शपथ! तुला पाहून आमच्या कुटुंबात दोन तरी साधी, सरळ समाजमान्य माणसं आहेत ह्याची खात्री पटली; म्हणजे तू आणि मॉनिका. बाकी सगळे विचित्र, जगावेगळे !”

एवढ्यात आतून एक लांब झगा, मोकळे लांब गुंतलेले केस, गळ्यात रंगीबेरंगी मोठ्या मण्यांच्या माळा या अवतारातली बाई हशीशच्या भपकाऱ्यासह बाहेर आली. आता मात्र संजयच्या चेहेऱ्यावर ‘मस्त करमणूक चालली आहे.’ असे भाव उमटले होते.

तिथे थोडा वेळ थांबून मॉनिकाने गाडी कॅंब्रिजकडे वळविली. शोफरला तीही जागा ठाऊक होती. तिथे एक प्रचंड व्हिक्टोरियनमध्ये (घराचा एक प्रकार) मॉनिकाने दरवाजाची बेल वाजवली. कुणी तरी दरवाजा उघडला. आत गेल्यावर पेंटचा उग्र वास नाकाला झोंबला. दरवाजा उघडणाऱ्या बाईने हाक मारली, ‘जीना (Geena) तुझी बहिण आलीय.’

“आता हा आणि कुठला नग?” संजय माझ्या कानात कुजबुजला. लांब केसांची, घट्ट जीन घातलेली चाळीशीची जीना आली. पुन्हा एकदा ओळखी करून दिल्या गेल्या. “मॉनिकाला मुलं आहेत हे फार बरं झालं.” जीना म्हणाली. मग तिने आमची तिच्या सध्याच्या बॉयफ्रेंडशी ओळख करून दिली. तिची पेंटींग्ज दाखविली. “माझी एकच महत्वाकांक्षा आहे.” ती म्हणाली, “मला प्रसिद्ध पेंटर व्हायचंय. त्यासाठी पेंटर्समध्येच राहायला पाहिजे.” मग तिने आमच्या घरातल्या सर्व पेंटर्सशी ओळखी करून दिल्या.

तिथून निघाल्यावर मॉनिकाने आपला एक भाऊ बुद्धांच्या आश्रमात थायलंडला राहतो व एक बहिण साऊथ अमेरिकेत माया संस्कृतीवर रिसर्च करते म्हणून सांगितले. तिच्या बौद्ध भावाला दोन मुले होती. ती कुठे तरी कॅलिफोर्नियाला त्यांच्या आईकडे होती. त्याला लग्न न करताच ही मुले झाली होती. अशी पण माहिती तिने पुरवली.

बॉस्टनहून तिने शोफरची बोळवण केली. टॅक्सीने आम्ही ब्रूकफिल्डला परत आलो. वाटेत तिने पुन्हा पुन्हा काय घडले ते गुप्त ठेवायची माझ्या व संजयकडून कबुली करून घेतली. ह्या सर्व प्रवासात टेड अगदी गप्प होता. आपल्या बहिण-भावांची ओळख करून देण्यापलीकडे

आतापर्यंत स्वतःविषयी, स्वतःच्या भावा-बहिणी विषयी व इस्टेटी विषयी ठेवलेल्या गुप्ततेविषयीच्या कारणाबद्दल चकार शब्दही मॉनिकाने उच्चारला नव्हता. माझ्या व संजयच्या देखत तिचे व टेडचे त्याबद्दल बोलणेही झाले नव्हते. साधारण परिस्थितीत जन्म घेतलेला व वाढलेला टेड ह्या नव्या लागलेल्या शोधामुळे बहुदा पूर्णपणे हादरला असावा असा मी अंदाज बांधला.

रात्री आम्ही घरी आल्यावर संजय हसला व म्हणाला,

“हा साला पैसा असला तरी त्याच्यापासून सुख नाही. नसला तरी सुख नाही. पाहिलंस ना मॉनिकाच्या बहिण-भावांनी कसा स्वतःच्या आयुष्याचा सत्यानाश करून घेतलाय ते. म्हणूनच मॉनिका घाबरली असावी. पैशापासून लपते आहे ती.”

“कुठे तरी सुवर्णमध्य असेल.” मी बिछान्यावर पडताना म्हटले.

“पण आपल्याला त्याची काय काळजी? त्या मध्यापासून आपण फार लांब आहोत पार दुसऱ्या टोकाला. मॉनिकाच्या ह्या नाटकात आपली भूमिका फक्त प्रेक्षकाची !”

(क्रमश:)

**ललिता गंडभीर**

पूर्वप्रसिद्धी : माहेर, ऑगस्ट १९८६ .
तारेवरची कसरत, विद्या प्रकाशन, जून १९८७.